सकाळ

# सायबर शिक्षा अभियानात आळे येथील चौघांची निवड

**आळेफाटा, ता. १३ :** आळे(ता. जुन्नर) येथील ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळ संचलित बाळासाहेब जाधव महाविद्यालयातील बीसीए व बीएस्सी (संगणक शास्त्र) विभागातील चार विद्यार्थ्यांची क्विक हिल फाऊंडेशनच्या वतीने राबविण्यात आलेल्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या अभियानासाठी क्लब ऑफिसर म्हणून अक्षदा हाडवळे, रोहन टाकळकर, मिसबाह इनामदार, वरद वाघ या चार विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

या विद्यार्थ्यांचे ट्रेनिंग व ओरिएंटेशन विमान नगर (पुणे) येथील क्विक हिल कंपनीच्या



**आळेफाटा (ता. जुन्नर) :** क्विक हिल फाऊंडेशनच्या संस्थापक अनुपमा काटकर यांच्यासमवेत बाळासाहेब जाधव महाविद्यालयातील निवड झालेले विद्यार्थी आणि शिक्षक प्रतिनिधी.

ऑफिसमध्ये घेतले. या ट्रेनिंग सेशन दरम्यान विद्यार्थ्यांना अजय शिर्के, सुगंधा दाणी, गायत्री पवार यांनी मार्गदर्शन केले. क्विक हिलच्या चेअर पर्सन अनुपमा काटकर यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. निवड झालेले विद्यार्थी पुढील काही दिवसांसाठी क्विक हिल फाऊंडेशनच्या सायबर सिक्युरिटी अवेअरनेस बद्दल विद्यार्थ्यांना व सामाजिक घटकांना मार्गदर्शन करून त्यांच्यात जागरूकता निर्माण करण्याचे काम करणार आहेत. तसेच विभागप्रमुख प्रा. नूतन जोशी यांची या अभियानासाठी शिक्षक समन्वयक म्हणून निवड करण्यात आली.

प्राचार्य डॉ. प्रवीण जाधव या प्रकल्पाबद्दल सांगताना म्हणाले, ''निवड झालेले विद्यार्थी हे आपल्या शैक्षणिक संकुलाच्या सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडण्याचे काम करणार आहेत, तसेच हे अभियान सक्षमपणे राबविण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष अजय कुऱ्हाडे, बाळासाहेब जाधव, उपाध्यक्ष सौरभ डोके, मानद सचिव अर्जुन पाडेकर, खजिनदार अरुण हुलवळे तसेच संचालक किशोर कुऱ्हाडे, भाऊ कुऱ्हाडे, बबन सहाणे, उल्हास सहाणे, बाबू कुऱ्हाडे, शिवाजी गुंजाळ, जीवन शिंदे, दिनेश सहाणे, कैलास शेळके, प्रदिप गुंजाळ, देविदास पाडेकर, सम्राट कुऱ्हाडे, रमेश कुऱ्हाडे, शांताराम कुऱ्हाडे आदी मान्यवरांनी अभिनंदन केले.